CMYK




आज श्री शनैश्वर जयंती


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## विराट कोहलीचे वादळी शतक आरसबीचा हैदराबादवर विजय

**हैद्राबाद :** विराट कोहलीचे वादळी शतक आणि फाफचे संयमी अर्धशतकाच्या जोरावर आरसीबीने हैदराबादचा पराभव केला. हैदराबादने दिलेले १८७ धावांचे आव्हान आरसीबीने दोन विकेटच्या मोबदल्यात सहज पार केले. या विजयासह आरसीबीने १४ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे. आरसीबीचा हा सातवा विजय आहे. आरसीबीचा उर्वरित सामना गुजरातविरोधात बेंगलोरमध्ये होणार आहे. हैदराबादचा १३ सामन्यात नववा पराभव झालाय. हैदराबादकडून हेनरिक क्लासेन याने वादळी शतक झळकावले होते.. पण विराट कोहलीच्या शतकापुढे हे शतक फिके पडले.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १९ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २२९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# श्रीकांत देशमुखांवर पत्नीचा दावा करणाऱ्या, ‘त्या’ महिलेचा सांगोल्यात पुन्हा आक्रोश

## एरंडीच्या बिया खावून आत्महत्येचा प्रयत्न, सुदैवाने वाचली...

सुराज्य/सांगोला

**भारतीय जनता पार्टीचे सोलापूर जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख यांची पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या निर्मला यादव या महिलेने पुन्हा आक्रोश सुरू केल्याने भाजपात खळबळ उडाली आहे. गुरूवारी सांगोला तालुक्यातील जवळा गावाजवळील देशमुख वस्ती येथे तुफान नाट्य घडले. ही महिला देशमुख वस्तीतील श्रीकांत यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करून त्यांच्या वडिलांना भेटण्याचा प्रयत्न केला परंतु लालासाहेब देशमुख यांनी तुमचा नवरा येथे राहत नाही, जिथे राहतो तिकडे जावा म्हणून हाकलून दिले. त्यानंतर संतापाच्या भरात त्या महिलेने एरंडीच्या बिया खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यातून विषबाधा झाल्याने या महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर आहे. या महिलेने एक नवा व्हिडिओ सर्वत्र पाठवला आहे. ‘तुम्ही मंदिरात माझ्या गळ्यात मंगळसूत्र बांधले आहे, मला तुमची म्हणा’.अन्यथा ‘मी नाही जगू शकणार’, असा इशारा दिल्यामुळे श्रीकांत देशमुख यांच्या अडचणी वाढल्या आहेत.**



याबाबतचे वृत्त असे की- श्रीकांत देशमुख हे भाजपाच्या जिल्हाध्यक्ष पदावर असताना निर्मला यादव या महिलेने आपण त्यांची पत्नी असल्याचा दावा केला होता. एका ठिकाणी दोघेही प्रेमाच्या गोष्टी करत असतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या महिलेने हा गौप्यस्फोट केल्यानंतर देशमुख यांना आपल्या पदावर पाणी सोडावे लागले. या प्रकारामुळे भाजपाची सर्वत्र नाचक्की झाली.

या महिलेने गुरूवारी पुन्हा श्रीकांत यांच्या प्रेमाचा पाढा वाचायला सुरुवात केली.तिने देशमुखांचे घर गाठले पण श्रीकांत यांच्या वडिलांनी तिला दारातूनच हाकलून दिले.रागाच्या भरात एरंडीच्या बिया खाल्ल्यानंतर ती सांगोला पोलीस स्टेशनमध्ये हजर झाली.हा प्रकार समजल्यानंतर पोलिसांनी तिला ग्रामीण रुग्णालयात दुपारी एक वाजता दाखल केले.तिथे डॉ. साळुंखे यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील रुग्णालयात पाठविले. या महिलेने चाळीस एरंडीच्या बिया खाल्ल्यामुळे रक्तदाब वाढल्याचे डॉ.साळुंखे यांनी सांगितले.

खासदार रणजीत सिंह निंबाळकर यांच्या वाडेगाव येथील कार्यकर्त्यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये भाजपाच्या प्रमुख नेत्यांची बदनामी केली म्हणून फिर्याद दाखल केली आहे. त्याचाही परिणाम या महिलेवर झालेला दिसून येत आहे त्यानंतर तिने आज आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला,असे भाजपा नेत्यांचे म्हणणे आहे.

### तुम्ही मला घरात घ्या...

आत्महत्येच्या प्रयत्नापूर्वी व्हिडिओत ती असे म्हणते की- श्रीकांत मी तुझ्याशी लग्न केले आहे मला तुम्ही मंदिरात मंगळसूत्र घातलेले आहे. तरी तुम्ही मला घरात घ्या. मला तुमची म्हणा. मी तुमच्याशिवाय जगू शकत नाही. तुम्ही माझा स्वीकार नाही केला तर मी आत्महत्या करेन तुमच्या नावानेच जीवनाचा अखेरचा निरोप घेईन माझ्याकडे तुमच्याशिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळे मी माझे जीवन संपवत आहे श्रीकांत देशमुख मला तुमच्याशी शेवटचे बोलायचे आहे माझी जगण्याची लायकी राहिली नाही माझ्या जागी दुसरी मुलगी असती तर तिने पहिलेच असे केले असते.

### बीजेपीमुळे संसार उद्ध्वस्त

माझ्या मृत्यूस तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, श्रीकांत देशमुख व त्यांचे दोन भाऊ हे जबाबदार असतील असे तिने व्हिडिओत म्हटले आहे. ती पुढे म्हणते की मला कोणी पाठिंबा दिला नाही. मदत केली नाही. युवा मोर्चातील गणेश पांडे दिवेकर अमित शेलार नील सोमय्या दीपक ठाकूर संतोष आव्हाड आणि इतर लोकांना माहित आहे, मी कशी आहे ती, तसेच आशिष शेलार व दिव्या ढोले यांनाही माहीत आहे मी कशी आहे ती. माझा संसार होता. बीजेपीमुळे माझा संसार उद्ध्वस्त झाला आहे.

### कोण आहे, निर्मला...

निर्मला यादव ही महिला मूळची पुण्याची असल्याचे सांगण्यात येते.ती भाजपाची काम करत असे.ती चांगल्या घराण्यातली.भाजपाच्या कार्यातून तिची श्रीकांत देशमुख यांची ओळख झाली आणि त्यातून एकमेकांवर प्रेम जडले.एकांतातील प्रेमाचे संभाषण असणारा एक व्हिडिओ दीडवर्षांपूर्वी व्हायरल झाल्यानंतर देशमुखांना जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.यानंतर आई-वडील व भाऊ यांनी आमचा श्रीकांतशी काहीही संबंध नाही,असे सांगितले होते. या महिलेने पुन्हा टोकाचे पाऊल उचलल्याने देशमुख यांच्या प्रेमाचे प्रकरण कोणते वळण घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## हॉटेल चालकास मारहाण

सुराज्य/सोलापूर

दारू आणि जेवणाचे बिल बुडवण्यासाठी हॉटेलची तोडफोड करून चालकास मारहाण करण्यात आली. ही घटना मंगळवेढा येथील प्रणवराज हॉटेल येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी नाना ज्ञानेश्वर जगताप आणि राहुल ज्ञानेश्वर कोळी (दोघे रा.मंगळवेढा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या संदर्भात हॉटेलचे चालक सतीश कोंडूभैरी (रा.मंगळवेढा) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

# खंडणीसोबतच पोलिसांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

## सोलापूरच्या पत्रकारासह दोघांना गोळीबार करुन घेतले ताब्यात

सुराज्य/पुणे

पुण्यातील खराडीमधील इ ऑन आयटी पार्क येथे सॉफ्टवेअरचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीकडे ५ कोटी रुपयांची खंडणी मागितली. सापळा रचून अटक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांच्या अंगावर गाडी घालून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी खंडणीबहाद्दरांना गोळीबार करून पोलिसांनी ताब्यात घेतले.

ही घटना गुरूवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोलापूर-पुणे रोडवरील पाटस टोल नाक्याच्या जवळ घडली आहे. महेश सौदागर हणमे (रा. सोलापूर) असे हा पत्रकार व त्याचा साथीदार दिनेश हणमे (रा. सोलापूर) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आरोपी हे ऑगस्ट २०२२ पासून खराडी येथील इ ऑन आयटी पार्कमधील सॉफ्टवेअर व्यावसायिक संतोष पोपट थोर (रा. अलकॉन सोसायटी, खराडी, पुणे) यांच्याकडे खंडणी मागत होते. त्यांनी तब्बल ५ कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. आतापर्यंत संतोष थोर यांनी खराडी येथील सोनिटिक्स कंपनीचे कार्यालयात रोख व ऑनलाईन ३ लाख ८० हजार रुपये दिलेले आहेत. दरम्यान, थोर यांच्याकडे हणमे याच्याकडून वेळोवेळी पैशाची



मागणी होत होती. महेश हणमे हा स्वत: पत्रकार असल्याचे सांगत होता. त्याने फिर्यादीची बदनामी करण्याच्या उद्देशाने वेगवेगळया खोटया बातम्या तयार करून त्या बातम्या व्हॉट्सऍपवर व सोशल मिडियावर व्हायरल करून विविध लोकांना पाठवून पोलीस केस करण्याची धमकी दिली होती. दरम्यान, आज महेश हणमे याने व्यावसायिक संतोष थोर यांना कुठल्याही परिस्थिती आज ५ कोटी रुपये हवे आहेत. ती दिल्यास संतोष थोर यांना व त्यांच्या कुटुंबीयास जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यासाठी त्याने त्यांना मोहोळ येथील हॉटेल स्वराज येथे बोलावले होते. दरम्यान व्यावसायिक संतोष थोर यांनी याबाबतची माहिती गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली.

त्यानुसार पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, अप्पर आयुक्त रामनाथ पाकळे, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण आणि इतर पोलीस अंमलदार हे आरोपींच्या मागावर मोहोळकडे रवाना झाले. पोलीस आपल्या मागावर असल्याची चाहूल महेश हणमे यांस लागली. पाटस टोल नाक्याजवळ पोलीस गेले असता तेथे हणमे याने पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण यांनी प्रसंगावधान राखत हणमे याच्या गाडीच्या पाठीमागील चाकाच्या टायरवर पिस्तुलातून गोळया झाडल्या. आणि महेश हणमे व दिनेश हणमे यांना गाडीतून बाहेर काढून ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी संतोष थोर यांनी पुणे शहर चंदन नगर पोलीस ठाण्यात भा. द. वि. कलम. ३८६/३८७ कलमान्वये खंडणीचा तर पोलीस हवालदार सुरेंद्र दिलीप जगदाळे यांनी यवत पोलीस ठाण्यात पोलिसांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी ५१४/२०२३ भा. द. वि. कलम. ३०७,२२५, ३३२, ३५३, ५०४, ५०६(२), ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण अधिक तपास करीत आहेत.

तपास अधिकारी श्रीकांत चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता, ते म्हणाले की महेश हणमे व दिनेश हणमे यांच्याविरुध्द भा. दं. वि. ३८६, ३८७ नुसार गुन्हा दाखल केला आहे. त्यांना पुणे शासकीय रुग्णालयात आमची आणि हणमे यांची गुरुवारी रात्री ११.३० वाजता वैद्यकीय तपासणी पूर्ण करण्यात आली मात्र अद्याप त्यांना अटक करण्यात आली नाही.

## मुख्यमंत्रीपदी सिद्धरामय्यांच्या नावावर शिक्कामोर्तब

### शिवकुमारांना उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी

सुराज्य/बंगळुरु

कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदासाठी सिद्धरामय्या यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे, अशी माहिती काँग्रेसचे सचिव के. सी. वेणुगोपाल यांनी दिली. कर्नाटकात काँग्रेसला अभूतपूर्व यश मिळालं असलं तरीही अद्यापही मंत्रिमंडळ तयार झालेलं नाही. सिद्धरामय्या आणि शिवकुमार या दोघांमध्ये मुख्यमंत्री पदावरून रस्सीखेच सुरू झाल्याने मंत्रिमंडळाचा पेच निर्माण झाला. गेल्या ४८ तासांपासून या दोयांनीही दिल्लीत ठाण मांडल्याने कर्नाटकचा पुढचा मुख्यमंत्री कोण याकडे सर्वांचे लक्ष लागले होते दरम्यान, कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदासाठी सिद्धरामय्या यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे, अशी माहिती काँग्रेसचे सचिव के. सी. वेणुगोपाल यांनी दिली.



## छोट्या पुढाऱ्याने गौतमीचे टोचले कान...

### महाराष्ट्राचा बिहार करणार असेल तर आम्हाही मुसंडी मारू

सुराज्य/पंढरपूर

नृत्यांगना गौतमी पाटील हिचा राज्यात धुमाकूळ सुरू आहे.तरूणाईचे तिला पाठबळ असले तरी घरातल्या लोकांना गौतमीची अदाकारी बिलकूल मान्य नाही. तिच्यावर आता गुन्हे दाखल होऊ लागले आहेत. या गौतमीला आवरणार कोण? असा प्रश्न पडला आहे पण महाराष्ट्रातल्याच एका छोट्या पुढाऱ्याने गौतमीला कानपिचक्या देण्याची हिम्मत



दाखवली. जर गौतमी महाराष्ट्राचा बिहार करणार असेल तर अम्लालाही मुसंडी मारावी लागेल, असा निर्वाणीचा इशाराही या पुढाऱ्याने तिला दिल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

अगदी लहान वयात अस्सखलित मराठीत राजकीय व्यासपीठावर भाषण करणारा हा छोटा पुढारी आहे,घनश्याम दराडे. तो गुरूवारी पंढरपूरच्या दौऱ्यावर आला होता. त्याचा मुसंडी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.त्या पार्श्वभूमीवर त्याने श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्याने मीडियाशी संवाद साधला. त्यावेळी गौतमीच्या विषयात त्याने हात घातला. सध्या गौतमी पाटीलवर टीका केली की, लगेच प्रसिद्धी मिळते याची जाणीव असल्याने तिच्यावर अनेकजण तोंड सुख घेताना दिसतात. तसाच प्रकार आज या छोट्या पुढाऱ्याने देखील केला. यापूर्वी देखील घनश्याम याने गौतमी हिच्यावर टीका केली होती.

आपला आणि तिचा कोणताही वाद नसला तरी ती लावणी बदनाम करीत असल्याचे दराडेने म्हणत गौतमीने देखील आपला मुसंडी चित्रपट पाहावा असे आवाहन केले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नडी अप्पा !!


कल्याण

239-42-129

मेन बाजार

134-82-660


# सांगा, महापालिका का जीवावर उठतेयं!

## सुरक्षा साहित्यविनाच सफाई कर्मचाऱ्यांकडून होतेय ड्रेनेजची स्वच्छता

### मनपा अधिकाऱ्यांकडून उडवा उडवीची उत्तरे

सुराज्य/सोलापूर

महापालिका सफाई कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा साहित्यविना ड्रेनेज चेंबरमध्ये उतरून स्वच्छतेचे काम जीव धोक्यात घालून करण्यात येत आहेत. यामुळे सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे महापालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. महापालिकेच्या या जीवघेणी कामकाज पद्धतीबाबत संताप व्यक्त होत आहे.

गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास पाणीवेस तालीम ते लक्ष्मी भाजी मंडई या मार्गावर जवळपास दहा ते बारा फूट खोल ड्रेनेज चेंबरमध्ये उतरून दोन कर्मचारी काम करीत होते. त्यांच्याकडे कोणतेही सुरक्षा साहित्य नव्हते. ही गंभीर बाब आहे. यापूर्वी झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या मृत्यूच्या घटनांमधून महापालिकेने कोणताही धडा घेतला नाही. दरम्यान, या सफाई कामगारांना सुरक्षा साहित्य का दिले नाही? यासंदर्भात विचारणा केले असता तेथील निगराणी करणाऱ्या अधिकाऱ्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. दुसरीकडे महापालिकेचे अधिकारी आणि ठेकेदार हे नामानिराळे राहत असून यात मात्र पोटाची खळगी भरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा बळी जातो. वारंवार घडणाऱ्या अशा घटना रोखण्यासाठी महापालिका ठोस कार्यवाही करताना दिसून येत नाही.

**यापूर्वी घडल्या होत्या दुर्घटना :** यापूर्वी सोलापूर शहरात ड्रेनेजमध्ये उतरून काम करीत असताना गुदमरून सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. असे असतानाही याकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येत आहे. स्मार्ट सिटी मानल्या जाणाऱ्या सोलापूर शहरात महापालिकेचे सफाई कामगार सुरक्षा साहित्याविना काम करत असल्याचे दिसून येत आहे. सफाई कर्मचारी महापालिकेचे असो अथवा कंत्राट पद्धतीवर असो त्यांना नियमानुसार सुरक्षा साहित्य देण्याची आवश्यकता आहे.

**अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज :** सफाई कामगार कामावर असताना सुरक्षा साहित्य वापरतो की नाही ? या कामगारांना ऑक्सिजन मास्क, हँडग्लोज यासह इतर सुरक्षा साहित्य देण्यात आले की नाही ? याकडे महापालिकेचे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.

**चौकशी करून खबरदारी घेण्यास सांगू - आयुक्त :** सुरक्षा साहित्याशिवाय ड्रेनेजमध्ये काम करणे चुकीचे आहे. संबंधित झोन अधिकाऱ्याची चौकशी करून त्यांना सफाई कर्मचाऱ्यांची खबरदारी घेण्यास सांगू, असे पालिका आयुक्त शितल तेली उगले म्हणाल्या.



CMYK